# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/211 /२०२२
दिनांक : 11 APR 2022

प्रति,
मे.-------------------------------------------------

-------------------------------------------------

-------------------------------------------------

विषयः- खादयतेल... दरपत्रक मागणी..

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबत परिशिष्टात नमूद तपशीलाप्रमाणे खादयतेलाची खेरदी दरपत्रक पध्दतीने खालील अटी-शर्तीस अनुसरून करावयाची आहे. त्यास अनुसरून आपण आपले दर सोबतचे परिशिष्टात भरून सादर करावे.

**अटी/शर्ती –**

१. सोबतचे परिशिष्ठामध्ये आपले दर भरून आपल्या दुकानाचे कव्हरींग पत्रासह दयावयाचे आहेत. आपले दर **सर्व कर, GST-TDS, हमाली, वाराई शिर्डी येथील संस्थानचे भांडार विभागात पोहचचे वाहतूक खर्चासह प्रती क्विंटलचे दर सादर करावेत.**
२. दरपत्रकासोबत GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt, FSSAI लायसन्स व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी.
३. पुरविलेले खादयतेलाची श्री साईबाबा संस्थानचे लॅबमध्ये तपासणी करण्यात येईल व पुरविलेले तेल जर FSSAI Norms प्रमाणे नसलेस ते बदलून दयावे लागेल.
४. सदरचे खादयतेल हे शक्यतो १५ किलोचे डब्यामध्ये पुरवावे लागेल. १५ लिटर डब्यामध्ये पुरविल्यास ते किलो परिमाणाप्रमाणे रूपांतरीत करण्यात येईल मात्र बील क्विंटलच्या दराप्रमाणे आदा करण्यात येईल.
५. सदर खादयतेलाचे दरपत्रकाची दर वैधता दरपत्रकाचे अंतिम तारखेपासून १५ दिवसांचा राहील याचा दर भरतांना दरपत्रकधारकाने विचार करावा.
६. शिर्डी संस्थान हे धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.
७. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थानचे प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहाणार नाही.
८. सिलबंद पाकिटातील दरपत्रक संस्थानचे आवक विभागामध्ये विहित मुदतीत जमा करावेत. पाकिटावर **"खादयतेल खरेदी दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

९. खादयतेल पुरविलेनंतर साधारण १५ दिवसात बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी श्री साईबाबा संस्थानकडून आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.

१०. श्री साईबाबा संस्थानकडून पुरवठा आदेश दिलेनंतर ३-४ दिवसांत खादयतेलाचा पुरवठा करावा लागेल.

११. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.

१२. **संस्थानकडून सुर्यफुल, सोयाबिन व शेंगादाणा तेल या ३ प्रकारच्या तेल खरेदीसाठी दरपत्रके मागविण्यात आली आहेत. तथापि सदर तिनही तेलापैकी प्रथम प्राधान्याने सुर्यफुल तेल खरेदी करण्यात येईल. ते उपलब्ध न झाल्यास द्वितीय प्राधान्याने सोयाबिन/शेंगादाणा तेल खरेदी करण्यात येईल.**

१३. आपले दरपत्रक मंजुर झालेस आपण कोणत्या **ब्रॅण्डचे तेलाचा** श्री साईबाबा संस्थानला पुरवठा करणार याचा स्पष्ट उल्लेख दरपत्रकामध्ये करावा.

१४. दरपत्रक सादर करण्याची अंतीम दिनांक १८ / ४ /२०२२.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# खादयतेल खरेदी दरपत्रक परिशिष्ट

## अ- सुर्यफुल तेल

| अ.नं | मालाचा तपशिल | मागणी | ब्रॅण्डचे नांव | दर प्रती क्विंटल GST व सर्व समावेशक खर्चासह | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Edible Oil (Khadya Tel) **Sunflower**, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin | २५० क्विंटल | | | |

## ब- सोयाबिन तेल-

| अ.नं | मालाचा तपशिल | मागणी | ब्रॅण्डचे नांव | दर प्रती क्विंटल GST व सर्व समावेशक खर्चासह | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Edible Oil (Khadya Tel) **Soyabean**, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin | २५० क्विंटल | | | |

## क- शेंगादाणा तेल-

| अ.नं | मालाचा तपशिल | मागणी | ब्रॅण्डचे नांव | दर प्रती क्विंटल GST व सर्व समावेशक खर्चासह | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Edible Oil (Khadya Tel) **Groundnut**, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin | २५० क्विंटल | | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का